फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
सीआयएनः U45200MH1974SGC017206
कार्यालय :–महाव्यवस्थापक, नागपूर प्रदेश, नागपूर
एफडीसीएम भवन 359/B हिंगणारोड, अंबाझरी, नागपूर– 440 036
ई–मेल–rmngp328@gmail.com दुरध्वनी कमांक : (O) 0712-2811901 वेबसाईट : www.fdcm.nic.in

क्रमांक : एफडीसीएम/महाव्यनाप्र/आस्था/प्र.क.725/ 004 नागपूर, दिनांक : /06/2023 19 JUN 2023

## कार्यालयीन आदेश

विषय : श्री एन.के.उके, लिपीक यांना लिपीक पदाचा मानीव दिनांक मंजूर करणेबाबत.

संदर्भ : व्यवस्थापकीय संचालक यांचे कार्यालयीन पत्र कमांक प्रशा/आस्था–3/प्र.क. 190/2022–23/845 दि. 09/06/2023 Page 333

विषयांकित प्रकरणी संदर्भीय पत्रान्वये श्री एन.के.उके, लिपीक यांना दिनांक 12/03/2018 रोजीची मानीव दिनांक मंजूर करणेबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक कमांक एसआरव्ही–2002/प्र.क.2/2002/12 दिनांक 06/06/2002 प्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती संदर्भात मानीव दिनांक देण्याबाबत प्रकरण तपासणी अधिकारानुसार– मानीव दिनांक देण्याबाबतच्या प्रस्तावाची तपासणी करताना खालील मुद्दे लक्षात घेण्यात आले आहेत. Page 331

नागपूर प्रदेश, नागपूर स्तरावरील गट ड कर्मचाऱ्यांना गट क संवर्गात पदोन्नती समिती सभा दिनांक 06/03/2018 (चौकीदार पदावरून लिपीक संवर्गात पदोन्नती करिता सभा) चे कार्यवृत्तांताचे अवलोकन केले असता,

1.0 चौकीदार पदावरून लिपीक संवर्गात पदोन्नती करिता सभा दिनांक 06/03/2018 रोजी बोलाविण्यात आली. त्यातील पदोन्नतीकरिता पात्र चौकीदारांची निवडसूची ही सन 2018 रोजीचे चौकीदार यांचे ज्येष्ठता यादीनुसार ठरविण्यात आली होती. सन 2018 रोजीची चौकीदार यांची आपआपसी ज्येष्ठता (Inter-se-seniority) ही सरळभरतीचे वेळी निवडयादीतील कमांकानुसार न ठरविता रूजू झालेल्या दिनांकानुसार ठरविण्यात आली होती.

2.0 करिता पदोन्नतीचे वेळी श्री एन.के.उके यांचे निवडसुचीतील अस्तित्वात असलेले स्थानी त्यांना सेवाकनिष्ट असलेल्या चौकीदार श्री एन.एम.बोरकर यांना या कार्यालयाचे आदेश कमांक एफडीसीएम/महाव्यनाप्र/आस्था/8788 दिनांक 12/03/2018 अन्वये लिपीक संवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे.

3.0 निवडसुचीतील दोन्ही चौकीदार 1. श्री एन.एम.बोरकर व 2. श्री एन.के.उके यांचे गोपनीय अहवालाची प्रतवारी अ असून ते दोघेही त्यावेळीचे लिपीक पदावर पदोन्नतीकरिताचे सर्व निकष पुर्ण करीत होते. करिता श्री एन.के.उके, यांना देखील समितीच्या सभेत लिपीक पदावर पदोन्नतीकरिता पात्र ठरविण्यात आले होते.

4.0 करिता श्री एन.के.उके, लिपीक यांना दिनांक 12/03/2018 पासून लिपीक पदावरील मानीव दिनांक मंजूर करण्यात येत आहे.

5.0 श्री एन.के.उके, लिपीक यांना दिनांक 12/03/2018 रोजी मानीव दिनांक मंजूर केली असल्याने, त्यांची लिपीक पदावरील काल्पनिक वेतननिश्चिती दिनांक 12/03/2018 पासून करण्यात यावी. परंतु, व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लिमी., नागपूर यांचे संदर्भीय पत्रामध्ये नमूद केल्यानुसार– ही मानीव दिनांक प्रदान केल्यामुळे त्यांना वेतन व भत्ते अनुज्ञेय ठरणार नाहीत.

(ऋषिकेश रंजन)
महाव्यवस्थापक,
नागपूर प्रदेश, नागपूर

प्रति,
श्री एन.के.उके, लिपीक

मार्फत : विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, नागपूर

प्रतिलीपी : व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लिमी., नागपूर यांना त्यांचे संदर्भीय पत्राचे अनुषंगाने माहितीकरिता सविनय सादर.

प्रतिलीपी : विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.